यवतमाळ जिल्हयातील पारधी समाजाकरीता आरोग्य रक्षकांमार्फत आरोग्य सेवा पुरविण्याकरीता मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः आविवि-२०१९/प्र.क्र.२१७ /का-१७
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९

प्रस्तावना-

पारधी ही एक अति मागास जमात राज्यात आढळते. ह्या जमातीचा आरोग्य व पोषण या बाबत समस्या खूप मोठ्या प्रमाणात आहेत. राज्यातील इतर भागाबरोबरच यवतमाळ जिल्ह्यात या जमातीचे वास्तव्य दिसून येते. यवतमाळ जिल्ह्यात पारधी लोकांच्या आरोग्याच्या समस्या मोठ्या प्रमाणावर आहेत. ह्या भागात आरोग्य रक्षकाची नेमणूक केली तर प्राथमिक आरोग्य सुविधा पुरवली जाईल. तसेच पारधी समाजामध्ये जनजागृतीच्या माध्यमातून अनेक साथीचे आजार नियंत्रणात आणता येईल. दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ ही संस्था यवतमाळ जिल्ह्यात ग्रामीण भागातील मागासलेल्या लोकांच्या विविध समस्या बाबत कामकाज करते. तसेच कृषि, आरोग्य, उपजीविका याबाबत कामकाज करते. आत्महत्या ग्रस्त कुटुंबांसाठी शिक्षण, विद्यार्थ्यांना शिष्यवृती मिळवून देणे या बाबत ही संस्था कामकाज करते. तसेच जलसंधारण, जैविक शेती, बचत गट आदी बाबतही या संस्थेने विशेष कामकाज केलेले आहे. सबब, ह्या क्षेत्राचा सदर संस्थेचा अनुभव लक्षात घेता यवतमाळ जिल्ह्यात पारधी पाड्यांमध्ये आरोग्य रक्षकाच्या माध्यमातून आरोग्य सुविधा पुरविणे, आरोग्याबाबत त्यांच्यामध्ये जनजागृती करणे या कार्यक्रमार्तगत "Providing Preliminary Health Services to Paradhi comminity in Yavatmal District through Community Health Workers " ही योजना प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा/ पुसद व दीनदयाळ बहूउद्देशीय्य प्रसारक मंडळ, यवतमाळ यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय-

यवतमाळ जिल्ह्यात पारधी पाड्यांमध्ये आरोग्य रक्षकाच्या माध्यमातून आरोग्य सुविधा पुरविणे, आरोग्याबाबत त्यांच्यामध्ये जनजागृती करणे या कार्यक्रमार्तगत "Providing Preliminary Health Services to Paradhi comminity in Yavatmal District through Community Health Workers " ही योजना आदिवासी विकास विभाग व दीनदयाळ बहूउद्देशीय्य प्रसारक मंडळ, यवतमाळ यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु ५१.९८ लक्ष किंमतीच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक-१ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा/ पुसद यांनी करावी व आर्थिक व भौतिक अहवाल शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.टी-०९, पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना -टीटी २४००३९ जिल्हास्तर योजना) या लेखाशिर्षाखाली जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेल्या निधीतून करावा.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१३११४१३६८२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

GAJANAN RAMDAS DESHMUKH

Digitally signed by GAJANAN RAMDAS DESHMUKH
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9adf2fe1f77176611c6dae66e0049cd0f51f36579d7c577ba3ed2c944d27d926, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=dee8a196fb0bb879933a88f87075cc443d363994879d49e0c1ba541465369700, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=GAJANAN RAMDAS DESHMUKH
Date: 2019.09.13 11:52:27 +05'30'

(गजानन रा. देशमुख)

कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग

प्रत,

१) मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२) मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव,आदिवासी विकास,यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई
४) आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५) आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे
६) जिल्हाधिकारी, यवतमाळ
७) सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
८) उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर आयुक्त, आदिवासी विकास अमरावती.
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
११) महालेखापाल (लेखापरिक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ
१३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा व पुसद
१४) प्रतिनिधी, दीनदयाळ बहूउद्देशीय्य प्रसारक मंडळ, यवतमाळ
१५) संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१६) निवड नस्ती (का.१७) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

परिशिष्ट-१

१	**योजनेचे नाव**	"Providing Preliminary Health Services to Paradhi comminity in Yavatmal District through Community Health Workers "
२	**योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र**	यवतमाळ जिल्ह्यातील पारधी समाजाची जनसंख्या एकवटलेली गावे.
३	**वित्तीय तरतूद**	सन २०१९-२० मध्ये TT २४००३९- पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना या लेखाशिर्षाखाली जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेल्या निधीतून करावा.
४	**या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक**	**एकूण खर्च -रु.५१.९८ लक्ष** **लाभार्थी संख्या- पारधी समाज एकवटलेली ३० पाडे/बेडे**

अ. क्र	बाब	युनिट	प्रथम वर्षी होणारा खर्च	द्वितीय वर्षी होणारा खर्च	तृतीय वर्षी होणारा खर्च	एकूण खर्च (रुपये)
१	आरोग्य रक्षकाचे मानधन रुपये १५००/- प्रती महिना	३० आरोग्य रक्षक	५४००००	५४००००	५४००००	१६२००००/-
२	औषधे (आरोग्य रक्षकांजवळ असलेला औषधांचा साठा) रुपये १०००० प्रती वर्षी	३० आरोग्य रक्षक	३०००००	३०००००	३०००००	९००००० /-
३	मेडिकल कॅम्प साठी खर्च (चार महिन्यातून एकदा १० पाड्यांसाठी @ ५००० प्रती कॅम्प	३	१५००००	१५००००	१५००००	४५००००/-
४	फिरत्या दवाखान्यासाठी इंधन खर्च @ २०,०००/महिना तसेच गाडी चालक @ ५०००/महिना	-	३०००००	३०००००	३०००००	९०००००/-
६	आरोग्य रक्षकांचे प्रशिक्षण @ २००० प्रती आरोग्य	६	३६००००	३६००००		१०८००००/-

	रक्षक (प्रती वर्षी ६ प्रशिक्षण)				
एकूण खर्च		१६५००००/-	१६५००००/-	१६५००००/-	४९५००००/-
प्रकल्प व्यवस्थापन खर्च @ प्रकल्प खर्चाच्या ५ टक्के		८२५००/-	८२५००/-	८२५००/-	२४७५००/-
एकूण खर्च		१७३२५०० /-	१७३२५०० /-	१७३२५०० /-	५१९७५०० /-

५	**योजना राबवणारी यंत्रणा**	प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडा, पुसद व दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ
६	**योजनेचा उद्देश/ हेतू**	१) यवतमाळ जिल्ह्यात असणाऱ्या पारधी समाजाच्या लोकांसाठी आरोग्य रक्षकाच्या द्वारे आरोग्य सुविधा पुरविणे. २) आरोग्य रक्षकाच्या माध्यमातून पारधी पाड्यांमध्ये आरोग्य बाबत जनजागृती करणे.
७	**योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती**	**योजना राबविण्याची कार्यपद्धती खालील प्रमाणे असेल** १) सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ ही संस्था अंमलबजावणी यंत्रणा म्हणून कामकाज करेल. २) योजनेच्या अनुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील पारधी समाजाची लोकसंख्या एकवटलेल्या गावांमध्ये/पाड्यांमध्ये ३० आरोग्य रक्षकाची नेमणूक अंमलबजावणी यंत्रणेमार्फत केली जाईल. ३) योजनेच्या अनुषंगाने १५ पारधी पाड्यांचे मिळून एक असे एकूण दोन क्लस्टर तयार केले जाईल. ४) पहिल्या क्लस्टर मध्ये बाभुळगाव तालुक्यातील १, नेर तालुक्यातील ४ , दिग्रस तालुक्यातील १, दारव्हा तालुक्यातील ३, आर्णी तालुक्यातील ३ व यवतमाळ तालुक्यातील ३ अश्या एकूण १५ पारधी पाड्यांचा समावेश असेल. ५) दुसऱ्या क्लस्टर मध्ये घाटंजी तालुक्यातील ५, कळंब तालुक्यातील २ , राळेगाव तालुक्यातील ८ अश्या १५ पारधी पाड्यांचा समावेश असेल. ६) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रत्येक एका पारधी पाड्यासाठी एका आरोग्य रक्षकाची नेमणूक केली जाईल. ७) आरोग्य रक्षकांना प्रशिक्षण देतांना डॉ. आशिष सातव, महान ट्रस्ट यांचे प्रशिक्षण Module वापरले जातील ८) आरोग्य रक्षकाची नेमणूक अंमलबजावणी यंत्रणा व प्रकल्प अधिकारी हे एकत्रितरित्या करतील. ९) आरोग्य रक्षकांना दरमहा १५००/- रुपये इतके मानधन अंमलबजावणी यंत्रणेमार्फत दिले जाईल. १०) **आरोग्य रक्षकाची निवड करताना खालील बाबी विचारात घ्याव्यात-** अ) आरोग्य रक्षक हा स्थानिक रहिवासी असावा.

		आ) आरोग्य रक्षकाची नेमणूक करताना महिला आरोग्य रक्षकांनाही प्राधान्य द्यावे. इ) किमान १० वी पास असावा. ई) स्थानिक भाषा ज्ञात असावी. ११) आरोग्य रक्षक हे क्लस्टर समन्वयक यांना अहवाल सादर करतील. १२) आरोग्य रक्षक खालील प्रमाणे जबाबदारी पार पाडतील. अ) पाड्यामध्ये आजारी असलेल्या व्यक्तिला प्रथमोपचार देणे व त्याला दवाखान्यासाठी / आरोग्य केंद्र जाण्यासाठी संदर्भ देणे. आ) आजारी पडलेल्या व्यक्तिला व त्यांच्या घरातील व्यक्तींना आजाराची कारणे, घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करणे. इ) पाड्यामध्ये साथीच्या आजाराबाबत जनजागृती करणे . ई) आजारी व्यक्तिला औषधे घेण्याबाबत मार्गदर्शन करणे व आवश्यकतेनुसार ती व्यक्ति औषधे घेत आहे किंवा नाही हे पाहणे. उ) आजारी पडलेली व्यक्ति,त्याला दिलेली औषधे या बाबत वेळोवेळी नोंदी ठेवणे. ऊ) घरामध्ये व आजूबाजूला स्वच्छता ठेवणे, केर-कचरा यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे याबाबत मार्गदर्शन व जन जागृती करणे . ऋ) लसीकरण, स्वच्छ पाण्याचे महत्व, हात धुण्याचे महत्त्व, दातांचे आरोग्य, या बाबत जन-जागृती तसेच मार्गदर्शन करणे. ऌ) आरोग्याबाबत असणारी अंधश्रद्धा,गैरसमज दूर करणे. ऍ) गंभीर स्वरुपाच्या आजाराबाबत आजारी व्यक्तिला दवाखान्यात जाण्यासाठी प्रवृत्त करणे. १३) योजनेच्या अनुषंगाने वर्षातून चार वेळेस आरोग्य रक्षकास अंमलबजावणी यंत्रणे मार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. तसेच प्रत्येक आरोग्य रक्षकास प्रत्येक वर्षी १० हजार रुपयाची औषधे अंमलबजावणी यंत्रणे मार्फत देण्यात येईल. १४) सदर औषधांचा उपयोग पारधी पाड्यांकरिता करण्यात येईल. १५) योजनेच्या अनुषंगाने प्रत्येकी ४ महिन्यातून एकदा १० पाड्यांसाठी आरोग्य शिबीर राबविण्यात येईल. १६) योजनेच्या अनुषंगाने स्त्री रोग तज्ञ व फिजिशियनच्या मार्गदर्शनात १० दुर्गम बेड्यावर रोग निदान व उपचार शिबीर आयोजित करण्यात येईल. १७) दुर्गम भागात त्वरित उपचाराकरिता चल चिकित्सा केंद्र द्वारे आरोग्य सुविधा पुरवली जाईल.
८	**योजनेच्या अटी व शर्ती**	१) योजना विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेची असेल. २) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहिल. ३) प्रकल्पामध्ये होणाऱ्या बदलाची पूर्वकल्पना प्रकल्प अधिकारी व सनियंत्रण व मूल्यमापन समितीला देऊन समितीच्या मान्यतेनेच बदल करावा.

		४) प्रकल्प राबवितांना आरोग्य रक्षकास आवश्यक असणारे प्रशिक्षण/कार्यशाळा व प्रात्यक्षिके संस्थेद्वारे देणे बंधनकारक असेल. ५) अंमलबजावणी यंत्रणेमार्फत आरोग्य रक्षकांच्या माध्यमातून पुरविण्यात येणारी औषधे ही चांगल्या प्रतीची व मानकाची असावी. ६) योजनेच्या प्रगतीबाबत माहिती वेळोवेळी आयुक्त,आदिवासी विकास व शासनास सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील. ७) अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेला केलेल्या कामाचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. ८) सदर योजनेची अंमलबजावणी करताना चलचित्र (video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अंमलबजावणी यंत्रणा यांची राहील.
९	**सनियंत्रण व मूल्यमापन समिती**	**योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापना करीता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे**. १. प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प, पांढरकवडा - अध्यक्ष २. प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्रकल्प, पुसद - उपाध्यक्ष ३. जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य ४. पारधी समाजासाठी कामकाज करणारी प्रतिष्ठित व्यक्ति - आमंत्रित सदस्य ५. प्रतिनिधी, दीनदयाळ बहूउद्देशीय्य प्रसारक मंडळ -सदस्य ६. आरोग्य क्षेत्रातील तज्ञ (डॉ.आशिष सातव,मेळघाट) - सदस्य ७. आरोग्य क्षेत्रातील तज्ञ (डॉ. मनोज पांडे व डॉ. निता केसवानी) - सदस्य ८. सहा.प्रकल्प अधिकारी, प्रकल्प कार्यालय -सदस्य सचिव ➢ योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने करण्यात येणारे कार्य व त्याची प्रगती या बाबत अहवाल शासनास / आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी उपरोक्त समितीस असतील ➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ४ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात यावा. तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.
१०	**योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी**	३ वर्ष
११	**निधी वितरणाची कार्य पद्धती**	**सदर योजनेकरिता निधी वितरणाची कार्यपद्धती खालील प्रकारे निश्चित करण्यात येत आहे.** १) योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मंजूर झालेल्या रकमेच्या मर्यादेत खर्च करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची असेल. योजनेसाठी इतर

		कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही, याची दक्षता अंमलबजावणी यंत्रणेनी घ्यावी. तथापि, या प्रकल्पासाठी काही तातडीचा खर्च उद्धभवल्यास प्रस्तावास मंजूरी दिलेल्या बाबींमधील खर्चामध्ये बदल करून प्रस्तावाच्या मंजूर केलेल्या रकमेच्या मर्यादेत सदर खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना राहील. २) याकरीता येणारा खर्च TT २४००३९- पारधी समाजाच्या विकासासाठी विविध योजना या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० मध्ये जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेल्या निधीतून करावा. ३) प्रकल्प अधिकारी हे अंमलबजावणी यंत्रणेला कार्यारंभ आदेश देऊन प्रकल्पासाठी पहिल्या वर्षासाठी मंजूर रकमेतून ४० टक्के रक्कम अदा करतील. ४) सदर निधी प्राप्त होताच व कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर अंमलबजावणी यंत्रणा प्रत्यक्षात कार्यास सुरुवात करेल. ५) प्रत्यक्ष कार्य सुरु होऊन ०६ महिने झाल्यानंतर व कामाच्या प्रगतीनुसार व मूल्यमापन व सनियंत्रण समितीच्या अहवालानुसार व समाधानकारक शिफारस केल्यानंतर पहिल्या वर्षाची पुढील ४० टक्के निधी वर्ग करण्यात येईल. ६) योजनेच्या अंमलबजावणीचे एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर पहिल्या वर्षाचा उर्वरित २० टक्के निधी अंमल बजावणी यंत्रणेला वर्ग करण्यात येईल. ७) योजनेच्या अनुषंगाने आऊट सोर्सिंग करण्यात येणारे कर्मचारी यांचे मानधन देण्याची संपूर्ण जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील . ८) योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल वेळोवेळी आयुक्त,आदिवासी विकास नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.
१२	**योजनेची फलनिष्पती**	यवतमाळ जिल्ह्यातील ३० पारधी पाड्यांमध्ये आरोग्य रक्षकाच्या माध्यमातून आरोग्य सुविधा मिळणार.